**लक्ष्मी वाघमारेच्या आयुष्यातील एक दिवस**

**लक्ष्मी वाघमारे - मराठवाड्यातील एक तळागाळातले नेतृत्व**

मी उस्मानाबाद जिल्ह्यातल्या तुळजापूर तालुक्यात राहते. कोरो संस्थेच्या नेतृत्व विकास कार्यक्रमाअंतर्गत (ग्रासरूट लीडरशिप डेव्हलपमेंट प्रोग्रॅम, GLDP) मी कार्यरत आहे. मराठवाड्यातल्या चार जिल्ह्यांमधल्या १५ तालुक्यांमध्ये १६००० महिलांसोबत मी काम करते.

कोविड-१९ चे संकट येण्यापूर्वी मी महिन्यातले साधारण २०-२५ दिवस फील्डमध्ये काम करायची. बीड, नांदेड, लातूर, उस्मानाबाद या जिल्ह्यांमधले जे तालुके माझ्याकडे सोपवले आहेत, तिथल्या महिला मंडळाच्या सभासदांना भेटायची. आरोग्य, उपजीविका, घरात होणारा हिंसाचार अशा अनेक विषयांवर त्यांच्याशी बोलायची, त्यांच्या समस्या समजून घेऊन त्यांना त्या सोडवायला मदत करायची.

आता लॉकडाऊन सुरू झाल्यापासून माझा भरपूर वेळ फोनवर बोलण्यातच जातो. सकाळी साडेआठला जे फोन सुरू होतात, ते कधी कधी रात्री साडेदहा - अकरापर्यंत चालतात. मी त्या महिलांची चौकशी करते, त्यांच्या तातडीच्या गरजांबद्दल विचारते आणि त्यांना दुरून का होईना, पण मदत करण्याचा प्रयत्न करते.

या बायकांना सुरुवातीला फोनवर बोलणे कठीण जायचे. त्या केवळ कामापुरते, थोडक्यात बोलायच्या. पण हळूहळू त्यांना कळले की फोनवर बोलणे हाच काम करण्याचा आणि संवादाचा मार्ग उरलेला आहे. मग त्या सविस्तर बोलू लागल्या, आपल्या समस्या नीट मांडू लागल्या.

लॉकडाऊन सुरू झाला तेव्हा या महिलांना घरीच राहायला सांगिले होते. कारण या कोरोना आजाराचे स्वरूप नीट माहीत नव्हते आणि भीतीही होती. पण त्याहून मोठी समस्या होती ती म्हणजे त्यांना काम न मिळण्याची, आणि अर्थात, पैसे न मिळण्याची. पहिले दोन आठवडे आम्ही त्यांना सतत बाहेरच्या जगात काय चालू आहे त्याची माहिती देत होतो, आणि आम्ही त्यांना सर्वतोपरी मदत करू असा दिलासाही देत होतो.

आमच्या संस्थेत टीमसोबत संवाद साधण्याची आणि अधिकारांची एक उतरंड किंवा रचना आहे. जिल्हा पातळीवर आम्ही GLDP मेम्बर्स असतो, तालुक्यांमध्ये 'सहेली' असतात, प्रत्येक गावामध्ये तीन मुख्य व्यक्ती असतात - प्रमुख, अध्यक्ष आणि सचिव; आणि मग महिला मंडळाचे सभासद. या रचनेमुळे आम्ही

प्रत्येक महिलेशी संवाद साधू शकतो, प्रत्येक पातळीवर त्यांच्या काय समस्या आहेत ते जाणून घेऊ शकतो आणि त्या सोडवायचा प्रयत्न एकत्रितपणे करू शकतो.

**वेळ: सकाळी ९.३०**

लोहारा तालुक्यातल्या मार्डी गावातल्या एका विधवा महिलेला मी फोन करते. आमच्याकडून फोन आला याचे तिला फार अप्रूप वाटते. “आतापर्यंत मला कुठच्याही नातेवाईकाने फोन नाही केला. कोणी तरी आता माझी चौकशी केली - खूप बरं वाटतंय.”

ज्या बायका एकट्या आहेत, विधवा आहेत आणि एकट्याच राहत आहेत, त्यांना आमच्याकडून फोन आला की अतिशय समाधान वाटते. त्यांना घरातच राहावे लागते आहे, आणि घरात बोलायलाही कोणी नाही. कोरोच्या फील्ड टीमने फोन केल्यामुळे त्यांना वाटणारा एकटेपणा आणि भीती कमी व्हायला मदत होते आहे.

**वेळ: सकाळी ११.३०**

तालुका पातळीवर काम करणाऱ्या आमच्या काही सहेल्यांसोबत माझा कॉन्फरंस कॉल होतो. त्यांच्या गावांमध्ये काय समस्या आहेत हे मी त्यांना विचारते. “घरांत ताण-तणाव वाढले आहेत,” त्यातली एकजण सांगते.

कुटुंबातले पुरुष आता घरीच असतात. त्यामुळे बायकांना सर्व वेळ स्वयंपाकघरातच काम करावे लागते आहे. पुरुष बैठकीच्या खोलीत बसून टीव्ही पाहतात, गप्पा मारतात किंवा पत्ते खेळतात, आणि सतत काहीतरी खाण्याचे पदार्थ मागत राहतात. बहुतेक बायकांना या आयुष्याचा फार कंटाळा आलेला आहे. त्यांचा घरातला वावरसुद्धा नवऱ्याच्या मर्जीनुसार नियंत्रित होतो आहे.

एका गोष्टीबद्दल मात्र त्यांना आनंद झालेला आहे - दारूची दुकाने बंद आहेत! पूर्वी दुकाने उघडी असायची आणि पुरुषांच्या हातात पैसा खेळता असायचा, तेव्हा ते भरपूर पैसे दारूवर उडवून, पिऊन तर्र होऊन घरी यायचे आणि बायका-मुलांना मारहाण करायचे. आता दारू मिळतच नाही म्हटल्यावर दारू पिऊन होणारी मारहाण आणि शिवीगाळ तरी कमी झाली आहे.

**वेळ: दुपारी ३.३०**

एका चिंताग्रस्त बाईचा मला फोन येतो. पुढे काय होणार, कसे होणार याबद्दल ती विचारते आहे. “आमच्या घरात होती तेवढी ज्वारी सगळी संपली. पैसेपण संपलेत. काम कधी सुरू होणार? आमची कमाई परत कधी सुरू होणार? हे संकट संपणार तरी आहे की नाही?”

शेतीची आणि इतर कामे बंदच असल्यामुळे महिलांना पैशाची अतिशय चिंता वाटू लागली आहे. मध्यंतरी चेहऱ्यावर लावण्याच्या मास्कची खूप गरज निर्माण झाली, म्हणून काही बायकांनी मास्क शिवण्याचे काम सुरू केले. आम्ही काही ग्राम पंचायतींना हे मास्क विकत घ्यायला प्रवृत्त केले. आजपर्यंत आमच्या महिला मंडळांशी संबंधित असलेल्या बायकांनी ६५०० मास्क शिवून तयार केले आहेत. ग्राम पंचायतीकडून एका मास्कचे ८-१० रुपये त्यांना मिळत आहेत.

आमच्या असेही लक्षात आले की सर्व १६००० महिलांकडे आम्ही पूर्णतः लक्ष देऊ शकणार नाही. ज्या एकट्या, असहाय आहेत, किंवा ज्यांना मदतीची अतिशय निकड आहे अशा महिलांवर आम्ही लक्ष केंद्रित केले. गावपातळीवरच्या आमच्या प्रमुख महिलांना आम्ही अशा बायकांची यादी बनवून whatsapp च्या माध्यमातून आम्हाला पाठवायला सांगितली. गावोगावच्या अशा याद्या एकत्र करून आम्ही कोरोच्या मुंबईच्या टीमकडे पाठवल्या. नंतर प्रत्येक तालुक्यात आम्ही काही चांगली दुकाने निवडली, आणि त्यांना अत्यावश्यक घरगुती वस्तूंचे 'किट्स' बनवायला सांगितले. या दुकानदारांना बँक ट्रान्स्फरच्या माध्यमातून पैसे पाठवले. 'सहेली' म्हणून काम पाहणाऱ्या बायकांनी हे किट्स दुकानांतून घेतले आणि गावोगावी जवळपास ११०० असहाय महिलांपर्यंत त्यांचे वितरण केले.

**वेळ: संध्याकाळी ५**

आमच्या एका सहेलीशी मी बोलते आहे. तिने एका गावात ज्यांच्याकडे मोबाईल फोन नाही अशा महिलांना एकत्र केले आहे. आमच्या सभासदांपैकी जवळपास ३०% बायकांकडे मोबाईल फोन नसतोच. तिने फोन स्पीकरवर लावला आहे, आणि बायकांना समोर एकमेकींपासून सुरक्षित अंतरावर बसवले आहे.

यातल्या बहुतेक बायका मला सांगतात, की ही सहेली आता गावात येत नाही, किंवा माझीही त्यांच्याशी खूप दिवसांत भेट झालेली नाही, त्यामुळे त्यांना थोडे चुकल्या-चुकल्यासारखे वाटते आहे. त्यांच्या कानावर आलेल्या काही वदंता त्या मला सांगतात - अमुक झाडाची प्रार्थना केली, किंवा तमुक पूजा केली की हा व्हायरस निघून जाईल, इत्यादी. मी त्यांना समजावते की या सगळ्या अफवा आहेत आणि अशा कोणत्याही गोष्टीवर त्यांनी विश्वास ठेवू नये.

**वेळ: रात्री ८**

सहेल्यांसोबत पुन्हा एक कॉन्फरन्स कॉल - दिवसभरात काय काय झाले त्याचा आढावा - त्यांना कोणत्या समस्या आढळल्या, त्यावर त्यांनी कोणते उपाय केले, उद्या त्यावर अजून काय काम करावे लागेल

इत्यादी. गावपातळीवर काय चालू आहे त्याची अशी पूर्ण माहिती मिळाली की आम्हालाही ठरवता येते की कोणती समस्या वरच्या पातळीपर्यंत घेऊन जायची गरज आहे.

आम्हाला पूर्वी नेहमी असे वाटायचे की आमचे काम प्रभावीपणे करायचे असेल तर आम्ही प्रत्यक्ष गावोगाव फिरणे आवश्यक आहे. पण लॉकडाऊनमुळे हे दिसून आले आहे, की आमचे काम मोबाईल फोनच्या माध्यमातूनही बऱ्याच प्रभावीपणे करता येऊ शकते.

*टीप: लक्ष्मीने हे मुद्दाम नमूद करायला सांगितले आहे की ती कोरोच्या ३३ जणांच्या टीममधली एक आहे (चार कोरो फेलोज आणि कर्मचारी, आणि २७ सहेल्या). “आमच्या इतर टीम मेम्बर्सचा दिवसही साधारण असाच जातो. त्यामुळेच तर आम्ही चार जिल्ह्यातल्या १६००० महिलांपर्यंत पोहोचू शकतो.”*